**<u>रे. मु. क्र. २५/२०१९ मधील निशाणी क्र.४७ खालील आदेश.</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा वाटपासाठी असल्याने व हद्दींबाबत वाद नसल्याने तसेच त्या गटात गट नं.९२ हा एकमेव गट असल्याने वादींना दाव्यात मिळकतीचे वर्णन नमूद करतांना मिळकतीच्या चर्तु: सिमा टाकणे गरजेचे वाटले नाही. परंतु प्रतिवादींनी दाव्यात त्याबाबत हरकत घेतल्याने सदर दाव्यात मिळकतीच्या चर्तु:सिमा टाकणे गरजेचे आहे.

४. मिळकतीच्या चर्तु:सिमा नसल्याने प्रतिवादी यांनी सदर दाव्यात ऑर्डर ७ रुल ११ अन्वये चर्तु:सिमा टाकल्या नाही म्हणून दावा खारीज करण्याबाबत अर्ज केला आहे. अशा परिस्थितीत सदरचा दावा रद्द झाल्यास वादींना त्यांच्या दावा मिळकतीतील अविभक्त हिश्यापासून मुकावे लागेल व त्यामुळे मिळकतीच्या चर्तु: सिमा टाकण्यासाठी सदर दुरुस्ती अर्ज दाखल केलेला आहे.

५. सदर अर्जास प्रतिवादी क्र.२ यांनी हरकत नोंदविलेली आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.२२ अंतर्गत दि.२३.०७.२०१९ रोजी दाव्यातील मिळकतीचे वर्णन नमूद करतांना मिळकतीच्या चर्तु:सिमा टाकले नसल्याने ऑर्डर ७ रुल ११ नुसार अर्ज केलेला आहे. त्या अर्जावर वादीने पुरेशी संधी देवून देखील जबाब दाखल न केल्याने सदर अर्ज वादीच्या जबाबविना चालविण्याचे आदेश पारित झाले. परंतु वरिल परिस्थितीची माहिती असूनही वादीने सुमारे साडे पाच वर्षांनी दावा दुरुस्तीचा प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर व्हावा तसेच विपक्ष वादीस रक्कम रु.१०,०००/— कॉस्ट करण्यात येवून सदर अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा दाखल करतेवेळी दाव्यातील मिळकतीचे वर्णन नमूद करतांना

वादीने सदर दाव्याच्या चर्तु:सिमेबाबत वर्णन केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२२ अन्वये सदर दावा मिळकतीच्या चर्तु:सिमा नमूद नसल्याकारणाने ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे दावा खारीज करण्याकरीता अर्ज केला. सदर अर्जावर पुरेशी संधी देवून देखील वादीने जबाब दाखल केला नाही. त्यामुळे सदर अर्ज वादीच्या जबाबाविना चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर वादीतर्फे प्रस्तुतचा दुरुस्तीकामीचा अर्ज दाखल केलेला आहे.

७. अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागणी केलेली दुरुस्ती ही केवळ मिळकतीच्या वर्णनात चर्तु:सिमा टाकण्याच्या परवानगीबाबत आहे. सदरचा दावा हा वाटपासाठी आहे व हद्दींबाबत वाद नसल्यामुळे मिळकतीचे वर्णनांत चर्तु:सिमा टाकण्याची दुरुस्ती ही निव्वळ तांत्रिक स्वरुपाची दिसून येते. तसेच सदरची दुरुस्ती केल्याने दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही किंवा सदर दुरुस्ती केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही. तसेच प्रतिवादी क्र.२ याने सदरचा अर्ज विपक्ष वादीस रक्कम रु.१०,०००/— कॉस्ट करण्यात येवून अर्ज मंजूर करावा असे देखील त्यांचे जबाबात म्हटले आहे. सबब, सदर अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## <u>आ दे श</u>

**१.** निशाणी क्र.४७ वरील अर्ज रक्कम रु.१०००/— खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. सदर रक्कम वादीने प्रतिवादी यांस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

**२.** खर्चाची रक्कम रु.१०००/— पुर्ततेनंतर वादीने प्रस्तावीत दावा दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याची प्रत १४ दिवसांच्या आत दाखल करावी.

**३.** वादी व प्रतिवादी यांनी स्वत:चा खर्च स्वत: सोसावा.

**( व्ही.डब्ल्यू. खेंदाड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पिंपळगाव(ब)

दिनांक :— ११/०३/२०२५.
ठिकाण :— पिंपळगाव(ब)